**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**औरंगाबाद कृषी हवामान सल्ला** **मंगळवार दिनांक – ११.०२.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १२ ते १६ फेब्रुवारी, २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १२/०२ | १३/०२ | १४/०२ | १५/०२ | १६/०२ |
| पाऊस (मिमी) | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० |
| कमाल तापमान (अं.से.) | २६.० | २८.० | २८.० | २८.० | २८.० |
| किमान तापमान (अं.से.) | १६.० | १६.० | १६.० | १६.० | १७.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८८ | ८४ | ७६ | ६३ | ६६ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ५५ | ४७ | ३२ | ३४ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ०६ | ०३ | ०२ | ०२ | ०५ |
| वा-याची दिशा | पुर्व | पुर्व | पुर्व | नैऋत्य | पुर्व |

| हवामानाचा इशारा | जिल्हयात पुढील पाच दिवसात आकाश स्वच्छ राहील. | |
|---|---|---|
| **पिकांचे नाव** | **अवस्था** | **कृषि हवामान सल्ला** |
| कापूस | वेचणी / काढणी अवस्था | कोणत्याही परिस्थितीत कापसाची फरदड (खोडवा) घेऊ नये. पिकांचा पालापाचोळा, प-हाटया यांची लवकरात लवकर विल्हेवाट लावावी. |
| तुर | काढणी / शेंगा भरणे अवस्था | काढणी केलेल्या तुर पिकाची मळणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| करडई | वाढीची अवस्था | करडई पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० % ईसी १३ मिली किंवा ॲसिफेट ७५ % एसपी १६ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाणी उपलब्ध असल्यास करडई पिकास तुषार सिंचन पध्दतीने दोन ते अडीच तास पाणी दयावे. पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| रब्बी ज्वारी | वाढीची अवस्था | पाण्याची उपलब्धता असल्यास फुलोरा व दाणे भरण्याच्या अवस्थेत असलेल्या रब्बी ज्वारी पिकास पाणी दयावे. उशिरा पेरणी केलेल्या ज्वारी पिकावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापनासाठी थायामिथोक्झाम १२ % + लॅमडा सायहॅलोथ्रीन ९.५ % झेडसी ५ मिली किंवा स्पिनेटोरम ११.७ % एससी ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकांची आलटून पालटून फवारणी करावी. |
| केळी | वाढीची अवस्था | जुन मध्ये लागवड केलेल्या केळीच्या बागेत घडाचे वजनामुळे केळीचे झाड कोलमडुनये म्हणुन झाडास आधार दयावा. केळी बागेस पाणीव्यवस्थापन करावे. |
| आंबा | मोहर फुटणे | आंबा फळबागेत मोहोर फुटला असल्यास हानिकारक किटकनाशकाची फवारणी करू नये जेणेकरून परागीभवनास अडथळा निर्माण होईल. आंबा फळबागेत खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी प्रादुर्भाव झालेल्या झाडाच्या जुन्या वाळलेल्या फांदया काढुन टाकाव्यात. मुख्य खोडा लगत भुसा दिसुन आल्यास तारेच्या आकडयाने आतील आळया काढून नष्ट कराव्यात व छिद्रामध्ये पेट्रोलमध्ये बुडविलेला बोळा किंवा क्लोरपायरीफॉस द्रावणाचा (२ मिली प्रती लिटर पाणी) बोळा टाकावा व छिद्र शेणाने अथवा मातीने लिपून घ्यावे. |

| | | |
|---|---|---|
| द्राक्ष | घड वाढीची अवस्था | काढणीस तयार असलेल्या द्राक्ष घडांची काढणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत पाणीव्यवस्थापन करावे. |
| भाजीपाला | फळवाढीची अवस्था | काकडीवर्गीय भाजीपाला पिकात 'गमी स्टेम ब्लाईट' याचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरोथॅलोनील ७५ % डब्ल्युपी २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| फुलशेती | वाढीची अवस्था | गुलाबाच्या फुलांची मागणी लक्षात घेता गुलाबाच्या विविध जातींना चांगले दर मिळु शकतात. त्यासाठी फुलांच्या काढणीनंतर प्रतवारी व पॅकींग करून बाजारात पाठवावेत. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | शेळयांच्या / करडांच्या शरीरावर पिसवांचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी शेळया व करडांना नियमित गोठयापासून काही कालावधी जसे की एक महिना दुर अंतरावर ठेवावे, शेळयांचा गोठा स्वच्छ करून भिंतीवरील भेगा, जाळे, जळमटे, इत्यादी स्वच्छ करून ४ टक्के मिठाचे द्रावण फवारावे. तसेच शेळी व करडांच्या शरीरावर वनस्पतीजन्य किटकनाशक (१५ मिली निंबोळी तेल + १५ मिली कारंज तेल + २ ग्रॅम अंगाचा साबण + १ लिटर पाणी) याप्रमाणात द्रावण करून फवारणी करावी. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**